सत्यमेव जयते

सुजाता सौनिक
प्रधान सचिव
*Sujata Saunik*
Principal Secretary

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
मंत्रालय
कॉम्प्लेक्स बिल्डींग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय कंपाऊंड,
१०वा मजला, मुंबई ४०० ००१
दुरध्वनी : कार्यालय - ०२२-२२६१७३८८ फॅक्स : २२६१७९९९
ई-मेल : psec.pubhealth@maharashtra.gov.in
pspubhealth@gmail.com

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Public Health Department
Mantralaya
Complex Building, Gokuldas Tejpal Hospital Compound,
10th Floor, Mumbai - 400 001.
Phone : 022-22617388 Fax : 022-22617999
Email: psec.pubhealth@maharashtra.gov.in
pspubhealth@gmail.com

जा-क्र- 437 /2016
दिनांक - १/१/२०१६
12-1-2016

**विषय :- दिनांक १ जानेवारी २०१६ पासून जन्म-मृत्यू नोंदणी स्थानिक स्वराज्य संस्थेकडील सद्या कार्यरत असलेल्या संगणक प्रणाली ऐवजी केंद्र शासनाने विकसीत केलेल्या प्रणाली मध्ये करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) उपमहानिबंधक, जन्म-मृत्यू, भारत सरकार यांचे पत्र क्रमांक- No.2120/2014-VS(CRS)-Vol-11-1317, नवी-दिल्ली. दिनांक-०९/०७/२०१५.

२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या आंतर विभागीय समन्वय समितीची दिनांक- २६/११/२०१५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय क्रं.२

प्रिय श्री. निर्मो,

भारत सरकारच्या १९६९ च्या जन्म मृत्यू अधिनियम व महाराष्ट्र राज्य सन २००० च्या जन्म मृत्यू नोंदणी नियमानुसार राज्यात हा कार्यक्रम राबविण्यात येतो.

संदर्भ क्रं.१ अन्वये केंद्र शासनाने जन्म-मृत्यू नोंदणीसाठी देशात एकसारखी संगणक प्रणाली राहण्यासाठी नविन संगणक प्रणाली विकसीत करण्यात आली आहे. संदर्भ क्रं.२ अन्वये दिनांक २६/११/२०१५ रोजी राज्यस्तरीय आंतर विभागीय समन्वय समितीची बैठक घेण्यात आली.

त्यामधील निर्णयानुसार नागरी भागात केंद्र शासनाने विकसीत केलेल्या संगणक प्रणाली मध्ये राज्यात दिनांक १ जानेवारी २०१६ पासून जन्म-मृत्यू घटनांची नोंदणी करुन जन्म-मृत्यू प्रमाणपत्र वितरीत करणेबाबतचा निर्णय घेणेत आला आहे. त्यामुळे सद्यास्थितीला जन्म-मृत्यू नोंदणी करिता महानगरपालिका आणि नगरपालिका कार्यक्षेत्रात जन्म-मृत्यू नोंदणी करिता सद्या कार्यरत असलेल्या

वेगवेगळया संगणक प्रणाली मध्ये करण्यात येणा-या नोंदी बंद करुन त्याऐवजी केंद्र शासनाकडील उपलब्ध संगणक प्रणाली मध्ये जन्म-मृत्यू नोंदी घ्याव्यात व प्रमाणपत्र वितरीत करावे.

तरी कृपया आपले स्तरावरुन माहे १ जानेवारी २०१६ पासून जन्म-मृत्यू घटनांच्या नोंदी महानगरपालिके कडील सद्या जन्म-मृत्यू नोंदणीकरिता अस्तित्वात असलेल्या संगणक प्रणाली ऐवजी केंद्र शासनाच्या संगणक प्रणाली मध्ये घेऊन त्याव्दारे जन्म-मृत्यू प्रमाणपत्र वितरीत करणेचे आदेश संबंधितांना

त्वरित देण्यात यावेत व तसेच नगरपालिकेकडे या कामाकरिता सद्या अस्तित्वात असलेल्या केडीएमसी कडील संगणक प्रणाली ऐवजी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या संगणक प्रणाली मध्ये नोंदी करुन प्रमाणपत्र वितरीत करण्याची सुरुवात करण्याबाबत संबंधितांना त्वरीत आदेश देण्यात यावेत. व तसे या विभागास अवगत करावे, ही विनंती.

नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

(सुजाता सौनिक)

श्री. नितीन करीर
प्रधान सचिव
नगरविकास विभाग,
चौथा मजला, मंत्रालय,
मुंबई - ४०० ००१